सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्र.१२०/२०२२

विषय:— मा.कुलगुरू, मा.प्र–कुलगुरू, मा.अधिष्ठाते यांच्या सेवा गौरव समारंभाबाबत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.नितीन करमळकर यांचा कार्यकाळ बुधवार दिनांक १८ मे, २०२२ रोजी संपुष्टात येत आहे. त्यांचे सोबत प्र–कुलगुरू प्राचार्य डॉ.एन.एस.उमराणी, अधिष्ठाता डॉ.मनोहर चासकर, अधिष्ठाता डॉ.पराग काळकर, अधिष्ठाता डॉ.अंजली कुरणे व अधिष्ठाता डॉ.संजीव सोनवणे यांचाही कार्यकाळ संपुष्टात येत आहे. विद्यापीठाला मा.कुलगुरु यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थान मिळवून देण्यात या सर्वांचे मौलिक योगदान लाभले आहे.

या सर्व मान्यवरांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांच्या **'सेवा गौरव समारंभाचे'** आयोजन मंगळवार दिनांक १७ मे २०२२ रोजी सायंकाळी ४.०० ते ६.०० या वेळेत विद्यापीठातील खाशाबा जाधव क्रिडा संकुल (इंनडोअर हॉल) येथे करण्यात आलेले आहे. हा सेवा गौरव समारंभ पर्सिस्टंट सिस्टीम कंपनीचे संस्थापक अध्यक्ष डॉ.आनंद देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

तरी कृपया सदर कार्यक्रमास आपण उपस्थित रहावे अशी विनंती विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे. सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

गणेशखिंड, पुणे –४११ ००७.
जा.क्र.: आर/२/१५६
दिनांक : १३ मे, २०२२

डॉ. प्रफुल्ल पवार
कुलसचिव

प्रत माहितीसाठी आणि उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित राहण्याच्या विनंतीसह :

१. विद्यापीठाच्या सर्व मा. अधिकार मंडळाचे सदस्य
२. मा. विभागप्रमुख/मा. शाखा प्रमुख (सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग) — सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक/शिक्षकेतर सेवकांच्या व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.
३. मा. संस्थाचालक/ संचालक /प्राचार्य, सर्व संस्था व महाविद्यालये